# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

## कृषि नगर, अकोला (महाराष्ट्र) ४४४ १०४

वाचा:- १. विद्यापीठ जाहिरात क्र. बीईए/प्रकल्पग्रस्त/गट-क/जाहिरात/३८३४/२०२५, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२५
२. महाराष्ट्र शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. वेपुर-११२५/प्र.क्र.०१/सेवा-९, दि. ०२.०६.२०२५
३. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्हि-२०१५/प्र.क्र.४७०/कार्या.१२, दि. २७ मे, १६
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण १११८/प्र.क्र.४१७/१६-अ, दि. २८ डिसेंबर, २०१८

## जाहीरात संबंधीची सुचना

क्र. बीईए/प्र.जा./क ते ब/२०२५/ — दिनांक :- २१ जुलै, २०२५

उपरोक्त संदर्भ क्र. १ नुसार विद्यापीठ प्रकल्पबाधित कुटूंबामधुन प्रकल्पग्रस्तांचा सरळसेवेचा अनुशेष भरून काढण्याकरीता विशेष भरती मोहिमे अंतर्गत वरिष्ठ लिपीक, शाखा सहायक-नि-टंकलेखक, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), ग्रंथालय सहायक, वरिष्ठ यांत्रिक, कनिष्ठ यांत्रिक, पंप परिचर व वाहन चालक या संवर्गाची एकुण ८० रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. त्याबाबतची सविस्तर जाहिरात **www.pdkv.ac.in** या विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे.

उपरोक्त जाहिरातीमध्ये अ.क्र.३ वर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गाची ५ पदांची जाहिरात एस-१०:२९२००-९२३०० या वेतनश्रेणीकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे. संदर्भ क्र. २ वरिल वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेपुर-११२५/प्र.क्र.०१/सेवा-९ दि.०२.०६.२०२५ नुसार, या विद्यापीठांतर्गत असलेल्या कनिष्ठ अभियंता या पदाकरीता एस-१०:२९२००-९२३०० या वेतनश्रेणी ऐवजी दि. ०१.०१.२०१६ पासुन एस-१५:४१८००-१३२३०० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय केली आहे.

उपरोक्त प्रमाणे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदाची वेतनश्रेणी एस-१०:२९२००-९२३०० या ऐवजी दि. ०१.०१.२०१६ पासुन एस-१५:४१८००-१३२३०० प्रमाणे श्रेणीवर्धन झाल्याने संदर्भ क्र. ३ वरिल शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्हि-२०१५/प्र.क्र.४७०/कार्या.१२, दि. २७ मे, २०१६ मध्ये ठरवुन देण्यात आलेल्या निरनिराळया वेतनश्रेणीतील पदांच्या वर्गीकरणानुसार सदर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) हे पद "गट-ब" वर्गामध्ये आले आहे.

संदर्भ क्र. ४ वरिल शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण १११८/प्र.क्र.४१७/१६-अ, दि. २८ डिसेंबर, २०१८ मधील अ.क्र.५ नुसार प्रकल्पग्रस्त आरक्षण हे फक्त गट-क व गट-ड मधील पदांना लागु असल्याने, उपरोक्त श्रेणीवर्धनापुर्वी गट-क वर्गामध्ये मोडत असलेले कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) हे पद, श्रेणीवर्धनानंतर गट-ब मध्ये समाविष्ट झाल्याने सदर पद विद्यापीठाव्दारे प्रकल्पग्रस्त सदराखाली प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमधुन वगळण्यात येत आहे. याबाबत सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

कुलसचिव,कविता
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला